


# ‘मित्सुबिशी आऊटलँडर’ बाजारात

पुणे, १७ नोव्हेंबर/ प्रतिनिधी

पुण्यातील ‘ईशान्य’ मध्ये मित्सुबिशीच्या नवीन आंतरराष्ट्रीय ‘एस.यू.व्ही. मित्सुबिशी आऊटलँडर’ या गाडीचे उद्‌घाटन झाले. या गाडीत शहरी तसेच टेरेन ड्रायव्हिंगसाठी आवश्यक बाबींचा समावेश या गाडीत करण्यात आलेला आहे. या गाडीची अंतर्गत रचना आरामदायक आहे. यातील दोन ड्राईव्ह मोड्‌सचा ताबा ड्राईव्ह मोड सिलेक्टर डायलमध्ये दिलेला असल्यामुळे अगदी आव्हानात्मक रस्त्यांवरून जाणेही शक्य होते. ■

# जे विल्यम्स ॲन्ड कंपनीतर्फे 'मित्सुबिशी आऊटलँडर' सादर

**जे विल्यम्स ॲन्ड कंपनी या हिंदुस्तान मोटर्सच्या अधिकृत डिलरतर्फे पुण्यात मित्सुबिशीच्या नवीन एसयूव्ही मित्सुबिशी आऊटलँडर हे मॉडेल सादर केले. हे मॉडेल जगभरात यशस्वी झाले असून, त्यांत जगप्रसिद्ध अशा शहरी ड्रायव्हिंग आणि टेरेन ड्रायव्हिंगसाठी उपयुक्त गोष्टींचा मिलाफ घडवून आणला आहे.**




दिमाखदार धाटणी आणि चांगली कार्यक्षमता यामुळे आऊटलँडर एक नावीन्यपूर्ण अनुभव देते. आरामदायक अंतर्गत सजावटीमुळे ऐसपैस आणि आरामदायक बसण्याची जागा आपणास मिळते. आऊटलँडरमध्ये ऑल इंडिया कंट्रोलयुक्त असे २.४ लिटर, १५ वॉल्व्ह एमआयव्हीईसी पेट्रोल इंजिन पुरवण्यात आले आहे. यामुळे ही कार आपणास १७० पीएस/६००० आरपीएम इतकी शक्ती आणि २२६ एनएम/४१०० आरपीएम इतका टॉर्क देते. याच्या भक्कम बॉडीमुळे गाडी हाताळण्यास सहज सोपी असून, त्यात ॲल्युमिनिअमचे छत दिल्याने गाडी हलकी बनली आहे. यामध्ये ९ स्पिकर रॉकफोर्ड पद्धती दिल्याने सुरक्षितता आणि त्याचबरोबर चालवण्याचा अनोखा आनंद मिळावा यासाठी आकर्षक अशी उपकरणे बरोबर देण्यात आली आहेत.

या प्रसंगी जे विल्यम्स अँड कंपनीचे प्रमुख भागीदार नोशिर के इराणी यांनी सांगितले की, 'मित्सुबिशी आऊलटलँडर' ही गाडी आराम, स्टाईलिंग आणि कार्यक्षमता यांचा सुंदर मिलाफ असून सध्याच्या व्यावसायिक आणि कॉर्पोरेट मॅनेजर्ससाठी अतिशय उपयुक्त अशी गाडी आहे.

उद्घाटन झाल्यावर नोशिर हे इराणी यांच्या हस्ते पुण्यातील पहिल्या चार मित्सुबिशी आऊटलँडर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या गाड्यांच्या चाव्या सुपूर्त करण्यात आल्या. त्यामध्ये गौतम राजपूत, अनुप गुप्ता, दत्तात्रय मुळये आणि सुलेमान ए के बलवा यांचा समावेश आहे.

## मित्सुबिशी आऊटलँडरची **वैशिष्ट्ये :**

- २.४ लिटर एमआयव्हीईसी इंजिन
- ऑल व्हिल कंट्रोल
- ड्राईव्ह मोड सिलेक्टर डायल
- सिक्स स्पीड मॅन्युअल पॅडल शिफ्ट
- विविध माहिती देणारे डिस्प्ले
- की लेस ऑपरेटिंग सिस्टिम
- ऑटोमॅटिक क्लायमेट कंट्रोल एअर कंडिशनर
- फ्रंट हेडलॅम्प वॉशर
- स्टिअरिंग व्हीलमध्येच ऑडियो कंट्रोल्स आणि क्रुझ कंट्रोल्स
- ऑटो हेडलॅम्प टर्न ऑफ
- ऑटोमॅटिक डोअर लॉकिंग
- सिक्युरिटी अलार्म आणि इंजिन मोबिलायझर